सं.फौ.ख.क्र.१९३/२०१८.
सरकार वि. किशोर
नि.क्र.२७

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४ यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | : | **अरविंद कवडुजी घिये,** |
| **वय** | : | **५१ वर्षे, व्यवसाय : पोलीस हवालदार,** |
| **नेमणुक** | : | **एमआयडीसी नागपुर शहर पोलीस स्टेशन, नागपूर** |

**सरतपासणी-सहा.सरकारी अभियोक्ता श्री. डी.आय.बारस्कर यांच्यामार्फत शपथेवर सूरुः-**

१. दिनांक २०.०२.२०१८ मी हिंगणा पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी फिर्यादी नावे इंदीरा बावणे हिने तक्रार दिली होती. त्यानुसार अपराध क्रमांक ३३/२०१८ भादवी कलम २९४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. त्याची केसडायरी तपासाकरीता मला सोपविण्यात आली होती. तपासकामी माइ-याकडे एफआयआर, तोंडी रिपोर्ट, असे कागद देण्यात आले होते.

२. त्यानंतर मी घटनास्थळावर जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळ हे कान्होलीबारा येथील फिर्यादीच्या घरासमोरील रस्त्यावर होते. सदर पंचनामा मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्याला **नि.क्र.२८** देण्यात येत आहे. त्यानंतर मी साक्षीदारांचे बयान त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नोंदविले. त्यानंतर मी आरोपी विरुद्ध सबळ पूरावा असल्यामूळे सदरचा अंतिम अहवाल दाखल करण्यात आला. माइ-या तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, आरोपीने फिर्यादीस ग्रामपंचायतमध्ये तक्रार केल्याच्या कारणावरुन अश्लील शिवीगाळ करुन दमदाटी केली. मी आरोपीला ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. यु. सी. घांगरेकर यांचे मार्फत सूरुः-**

३. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीच घटनास्थळ वर जावून पंचासमक्ष कधीच घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना पोलीस स्टेशन येथे बोलवून तेथेच त्यांच्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयान त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कधीच नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरच्या प्रकरणात योग्य तो तपास न करता आरोपी विरोधात खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क. केले.

माझे समक्ष,
VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2025.12.24 18:57:53 +0530
(व्ही.एच.खेडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिंगणा.

हिंगणा.
दि.२४.१२.२०२५.